मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुक्रवार, दि. 14 जून 2024 | पान- 1

# मेट्रोच्या निगडीपर्यंतच्या कामाला सुरुवात

## पिंपरी ते निगडी या 4.519 किलोमीटर अंतराच्या महामेट्रोच्या विस्तारित मार्गाचे काम अखेर सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीपूर्वी भूमिपूजन झालेल्या पिंपरी ते निगडी या ४.५१९ किलोमीटर अंतराच्या महामेट्रोच्या विस्तारित मार्गाचे काम अखेर सुरू झाले आहे. त्यातील मार्गिकच्या ‘व्हायडक्ट’ या कामाचा ठेका केंद्र सरकारच्या रेल विकास निगम लिमिटेडला देण्यात आला आहे. सध्या मार्गावरील माती परीक्षणाचे काम सुरू आहे. या कामाची मुदत १३० आठवडे आहे. मुदतीत काम पूर्ण झाले तरच तीन वर्षांनी निगडीपर्यंत मेट्रो धावेल.



पहिल्या टप्प्यात पिंपरीतील महापालिका भवनापर्यंत मेट्रो सुरू झाली आहे. निगडीपर्यंत मेट्रो सुरू करण्याची शहरवासीयांची मागणी होती. त्यासाठी मोठे आंदोलन उभारण्यात आले. त्याची दखल घेत केंद्र शासनाने या विस्तारीत मार्गाच्या ९१० कोटी १८ लाख खर्चाच्या कामास २३ ऑक्टोबर २०२३ रोजी अंतिम मान्यता दिली. त्यानुसार निगडीतील भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक ते चिंचवडच्या मदर टेरेसा उड्डाण पुलापर्यंतच्या ५.५१९ किलोमीटर अंतराच्या ‘व्हायडक्ट’ कामाची निविदा काढण्यात आली. हे ३३९ कोटी खर्चाचे काम केंद्राच्या रेल विकास निगम लिमिटेडला मिळाले आहे. हा मार्ग उन्नत असून, तो निगडीहून पिंपरीच्या दिशेने जाणाऱ्या सेवा रस्त्याने उभारला जाणार आहे.

या कामासाठी निगडी, भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक, टिळक चौक आदी ठिकाणच्या सेवा रस्त्यावर सुरक्षा कठडे लावून माती परीक्षण करण्यात येत आहे. माती परीक्षण झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात येणार आहे. या कामाची मुदत १३० आठवडे आहे. हे काम अंतिम टप्प्यात आल्यानंतर लोहमार्ग टाकणे, सिग्नल व्यवस्था, विद्युतपुरवठा, स्थानक उभारणी आदी कामांची स्वतंत्रपणे निविदा काढली जाणार आहे. तीन वर्षे तीन महिन्यांत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर निगडीपासून थेट स्वारगेट, रामवाडी आणि वनाजपर्यंत मेट्रोने प्रवास करता येणार आहे.

माती परीक्षणाचे काम सुरू आहे. त्यानंतर पुढील काम केले जाईल. काम मुदतीमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे महामेट्रोचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत सोनवणे यांनी सांगितले. तर, शहराचे प्रवेशद्वार असलेल्या निगडीपर्यंत पहिल्या टप्प्यातच मेट्रो धावणे आवश्यक होते. आता महामेट्रोने वेगात आणि वेळेत काम पूर्ण करावे. जेणेकरून नागरिकांना निगडीतून पुण्यापर्यंत मेट्रोने प्रवास करता येईल, असे निगडीचे माजी नगरसेवक अमित गावडे म्हणाले.

### या मार्गावर चार स्थानके..

» हा संपूर्ण मार्ग उन्नत आहे. या मार्गावर चिंचवड, आकुर्डी, निगडी आणि भक्ती-शक्ती चौक अशी ४ स्थानके असणार आहेत. महापालिका स्थानक ते चिंचवड स्थानकातील अंतर १.४६३ किमी आहे. चिंचवड ते आकुर्डी स्थानकातील अंतर १.६५१ किमी, आकुर्डी ते निगडी अंतर १.०६२ किमी आणि निगडी ते भक्ती-शक्ती चौक अंतर ९७५ मीटर असणार आहे. हे काम जलद गतीने पूर्ण होण्यासाठी व्हायाडक्ट बांधण्याबरोबरच ठेकेदाराला स्थानकाचे कोनकोर्स व फलाटाच्या स्लॅबचे काम करावे लागणार आहे. त्यामुळे स्थानकाच्या बांधणीचा वेळ वाचणार आहे.

# पिंपरी विधानसभेसाठी देवेंद्र तायडे आणि मयूर जाधव यांना उमेदवारी द्यावी

## प्रदेशाध्यक्ष पंडीतराव कांबळे यांच्या उपस्थितीत पिंपरीच्या पक्ष कार्यालयामध्ये बैठक पार पडली

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष सामाजिक न्याय विभाग प्रदेशाध्यक्ष पंडीतराव कांबळे यांच्या उपस्थितीत पिंपरीच्या पक्ष कार्यालयामध्ये बैठक पार पडली. यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या संघटनात्मक बांधणी संदर्भात आणि लोकसभा आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते. शहरात आल्याबरोबर सामाजिक न्याय विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक चौक, पिंपरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. या बैठकीत कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पिंपरी विधानसभा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळावा आणि पक्षामार्फत देवेंद्र तायडे किंवा मयूर जाधव यांना उमेदवारी



द्यावी अशी कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्षांसमोर मागणी केली. पिंपरी चिंचवड शहरात पक्ष संघटनेत काम करणाऱ्या आणि शरद पवार साहेबांच्या विचाराशी एकनिष्ठ असणाऱ्या पदाधिकाऱ्यांना संधी मिळायला हवी अशी भावना व्यक्त होत आहे

पूर्वी वंचित बहुजन आघाडीमध्ये काम केलेले देवेंद्र तायडे हे सध्या पिंपरी चिंचवड शहरातील पक्षाचे कार्याध्यक्ष असून, पक्ष फूटीनंतर खंबीरपणे आदरणीय शरद पवार साहेबांची साथ देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. एक सुशिक्षित आणि संयमी चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आगामी काळात पक्षाने त्यांना संधी दिल्यास पक्षाला निश्चितच फायदा होईल असे सांगण्यात येते.

पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष असणारे मयूर जाधव हे पक्षातील एक तरुण आणि उच्चशिक्षित चेहरा असून सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून त्यांनी शहरात भरीव कामगिरी केली आहे. पक्ष संघटनेत प्रदेश सरचिटणीस म्हणूनही काम पाहिलेले मयूर जाधव यांनी शरद पवार आणि त्यांच्या विचारधारेसोबत राहण्याचा निर्णय घेतला आणि लोकसभेत त्याची चुणूकही दाखवून दिली. उच्चशिक्षित चेहरा, मतदारांशी असणारा संपर्क या मयूर जाधव यांच्या जमेच्या बाजू आहेत. प्रदेशाध्यक्ष पंडित कांबळे यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे मत जाणून पिंपरी विधानसभा मतदारसंघ हा महविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे कसा राहील याबाबत आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. तसेच देवेंद्र तायडे आणि मयूर जाधव यांच्या नावाची शिफारस पक्ष नेतृत्वाला केली जाईल असे सांगितले. आगामी काळात विधासभेसाठी पक्षाचा उमेदवार कोणीही असला तरी आदरणीय शरद पवार साहेबांच्या विचाराचाच उमेदवार पिंपरी विधानसभेत विजयी होणार असा विश्वास सर्वांच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

यावेळी संघटित कामगार चे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ नखाते,सामाजिक न्याय प्रदेश उपाध्यक्ष संजय गायकवाड, वरिष्ठ उपाध्यक्ष काशिनाथ जगताप,सरचिटणीस के.डी.वाघमारे, मुख्य प्रवक्ते माधव पाटील, महिला चिंचवड विधानसभा उपाध्यक्ष कविता कोंडे, संघटक विवेक विधाते, संदीप गायकवाड ,सचिन सकाटे , सूरज देविकिरी , विकास रंधवे, जे आर कुंभारे, राजेंद्र कड्डू, आकाश शिंदे,राजाभाऊ निमसे, रमेश उपार, पांडुरंग विर, आजिनाथ सकट, सलीम डांगे,सुनील कांबळे, रवी पवार, रोहित जाधव, अविनाश कांबळे आदी उपस्तिथ होते.

# ‘बत्ती गुल’मुळे उद्योग संकटात!

## विजेच्या लपंडावाचा चाकण एमआयडीसीतील कंपन्यांना ‘शॉक’ : उद्योगांना मोठा फटका

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक वसाहतीत मागील काही काळापासून वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. उन्हाळ्यात हे प्रमाण वाढल्याने उद्योगांना मोठा फटका बसत आहे. अनेक कंपन्यांना काम बंद ठेवावे लागत असून, त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. यामुळे संकटात सापडलेल्या उद्योजकांनी अखेर महावितरणच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यानंतर महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीत सुधारणा करण्याची पावले उचलली आहेत.



चाकण औद्योगिक वसाहतीत वारंवार वीज पुरवठा खंडित होतो. याबाबत कंपन्यांना कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही. महावितरणकडून देखभालीचे काम सुरू असेल तर आधी याबाबत कंपन्यांना कळविले जात नाही. यामुळे अचानक कंपन्यांचे काम बंद पडते. उन्हाळ्यात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण आणखी वाढले आहे. यामुळे कंपन्यांचे काम बंद राहून उत्पादन ठप्प झाले आहे. याचा आर्थिक फटका कंपन्यांना बसत आहे. यामुळे फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजने अखेर महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा केली.

महावितरणचे विभागीय संचालक अंकुश नाळे आणि अधीक्षक अभियंता युवराज जरग यांच्यासोबत फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजची बैठक झाली. या बैठकीला फेडरेशनचे सचिव दिलीप बटवाल, संचालक मनोज बन्सल, ग्रॅबियल कंपनीचे व्यवस्थापक विनोद राजधान, पूना प्रेसिंगचे व्यवस्थापकीय संचालक संजय गुप्ता, ॲडविकचे नितीन सावंत, निखिल अग्रवाल यांच्यासह ७० कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी उद्योजकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढूनही महावितरणचे स्थानिक अधिकारी दाद देत नाहीत, अशी तक्रारही त्यांनी केली. यावर महावितरणे विभागीय संचालक अंकुश नाळे यांनी बैठकीत स्थानिक अधिकाऱ्यांना याबाबत फैलावर घेतले. चाकणमध्ये देखभालीची कामे वेळेत केली जातील आणि उद्योगांना अखंडित वीजपुरवठा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

### उद्योजकांच्या अडचणी संपेनात...

- देशात सर्वाधिक दराने महाराष्ट्रात उद्योगांना वीज
- वारंवार वीज पुरवठा खंडित झाल्याने उत्पादन ठप्प
- वीज पुरवठ्याचा दाब कमी जास्त झाल्याने यंत्रसामग्री खराब
- काम बंद असतानाही कामगारांना वेतन देण्याची वेळ
- उत्पादन कमी झाल्याने अनेक वेळा कार्यादेश रद्द
- आर्थिक नुकसान वाढल्याने अनेक उद्योग संकटात

> “ चाकण उपविभागातील १ लाख १३ हजार ग्राहक असून, त्यात चाकण औद्योगिक वसाहतीतील सुमारे ७ हजार ८०० उच्च व लघुदाबाचे उद्योग आहेत. महावितरणकडून चाकण औद्योगिक वसातहतीतील उद्योगांना चांगली सेवा देण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
> - राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, महावितरण.

> “ अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे चाकणमधील उद्योगांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यातच वीज पुरवठा खंडित होत असल्याने कंपन्यांचे नुकसान होत आहे. देशात सर्वात जास्त विजेचा दर महाराष्ट्रातील उद्योगांसाठी आहे.
> - दिलीप बटवाल, सचिव, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज.

# महारेरालादेखील न जुमानण्यात पुण्याचे बिल्डर टॉपवर

## शहरातील तब्बल 438 प्रकल्पांची नोंदणी रद्द : वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यात अपयश

**पुणे | प्रतिनिधी**

महारेराच्या (महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरी अॅथॉरिटी) नियमांचा भंग करण्यामध्ये राज्यात पुण्यातील बिल्डर आघाडीवर असल्याचे चित्र समोर आले आहे. वेळेत प्रकल्प पूर्ण न केलेल्या तसेच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ न घेणाऱ्या प्रकल्पांच्या महाराष्ट्रातील यादीत सर्वाधिक पुण्याचे असून यातील तब्बल ४३८ प्रकल्पांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

महारेराने राज्यातील निर्धारित वेळेत पूर्ण न केलेल्या (लॅप्स) १,७५० प्रकल्पांची नोंदणी निलंबित तसेच रद्द केली आहे. १,१३७ प्रकल्पाविरोधात नोंदणी निलंबनाची कार्यवाही सुरू आहे. महारेराच्या नोंदणीनुसार वेळेत प्रकल्प पूर्ण न केल्याने तसेच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ न घेणाऱ्या प्रकल्पांचा ‘लॅप्स’ यादीत समावेश करण्यात येतो. या यादीमध्ये सर्वाधिक ४३८ प्रकल्प पुण्यातील आहेत. यामध्ये पुण्यातील अनेक प्रथितयश बिल्डरांचा समावेश आहे.पुण्यातील बहुतांश प्रकल्प शहराच्या मध्यवर्ती भागातील, कोथरूड, आंबेगाव, खराडी, मुंढवा, उंड्री, बाणेर पिंपरी चिंचवड भागातील हिंजवडी, वाकड आदी ठिकाणी आहेत. रायगडमधील २०७, ठाण्यातील १८३ आणि मुंबई उपनगरातील १०६ प्रकल्प आहेत. या प्रकल्पाच्या विकसकांनाही नोटीस बजावण्यात आली आहे.



प्रकल्पांनी ‘लॅप्स’ यादीत आल्यानंतरदेखील पुढील कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे महारेराने हा निर्णय घेतला आहे. निलंबित करण्यात आलेल्या प्रकल्पाची यादी महारेराच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी तपासूनच ग्राहकांनी घरखरेदी करावी, असे आवाहन महारेराकडून करण्यात आले आहे.

रेरा कायद्यानुसार गृहनिर्माण प्रकल्पासाठी महारेरा नोंदणी बंधनकारक आहे. ही नोंदणी करताना प्रकल्प केव्हा पूर्ण होईल, याची निश्चित तारीख नमूद करावी लागते. त्या वेळेत प्रकल्प पूर्ण करणेही बंधनकारक असते. वेळेत प्रकल्प पूर्ण न केल्यास महारेराकडून काही महिन्यांची मुदतवाढ घेता येते. मात्र मुदतवाढीची कार्यवाही न करणाऱ्या प्रकल्पाचा समावेश ‘लॅप्स’ यादीत केला जातो. त्या यादीतील प्रकल्पांना पुढील कोणतेही काम करता येत नाही किंवा प्रकल्पातील घरांची विक्री करता येत नाही. तसेच प्रकल्प व्यापगत घोषित झाला की त्याचे बँक खाते सील करण्यात येते. प्रकल्पाची जाहिरात, पणन त्यातील सदनिकांची विक्री, नोंदणी करता येत नाही. त्यावर बंदी येते. दरवर्षी महारेराकडून अशी यादी जाहीर केली जाते.

दरम्यान ‘लॅप्स’ प्रकल्पातील ग्राहकांचा विचार करता महारेराने नूतनीकरणाची संधी दिली होती. त्यानुसार राज्यातील एकूण प्रकल्पांचा आढावा घेऊन अशा प्रकारच्या ६,६३८ प्रकल्पांना ३० दिवसांची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

### प्रत्येक वेळी चूक बिल्डरचीच नसते : क्रेडाई अध्यक्ष

क्रेडाई पुणेचे अध्यक्ष रणजित नाईकनवरे म्हणाले, अनेक वेळा महापालिका किंवा पीएमडीआरएचे संबंधित कार्यक्षेत्र कार्यालयातून त्यांना कागदपत्रे मिळू शकत नाही. काही वेळा खरेदीदार न्यायालयाचा दरवाजा ठोठावतात. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत विलंब होतो. त्यामुळे महारेराने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी वेगवेगळ्या निकषांची तपासणी करण्याची गरज आहे. रिअल इस्टेट रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट ॲक्ट, २०१६ च्या कलम ७ (३) अंतर्गत प्रवर्तकाने नियमांचे पालन केले नाही तर कागदपत्रांच्या आधारे एक वर्षाची मुदतवाढ मिळू शकते.

# इंद्रायणी नदीपात्रात मतीचा भराव टाकत अतिक्रमण

## इंद्रायणी नदीपात्रालगत, तसेच पूररेषेच्या जागेतच अनधिकृत प्लॉटिंग करण्याचे प्रकार सर्रास सुरु आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील पवना नदीनंतर महापालिका व पीएमआरडीए हद्दीतून इंद्रायणी नदी वाहते. इंद्रायणीच्या पात्रातही मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकून अनधिकृत विनापरवानगी बांधकामे, अतिक्रमण करण्याचे प्रकार सुरू आहेत.

देहू येथे इंद्रायणी नदी पात्रात एकाने मातीचा भराव टाकला आहे. तसेच, त्या भरावात वृक्षारोपण करून त्या जागेचा वाहनतळासाठी वापर करण्यात येत आहे. संबंधित शेतकऱ्याला सदरची जागा खाली करण्यास सांगितले आहे, अशी माहिती पुणे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल यांनी देहू येथे दिली.

इंद्रायणी नदीच्या काठी अनेक नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी पूर नियंत्रण रेषेच्या आतमध्ये बांधकामे केलेले आहे. तर काहीजणांनी नदी नदीपात्रात मातीचा भराव टाकून नदीपात्र अडविण्याचा प्रयत्न केला आहे. नुकतेच जिल्हाधिकारी डॉ. सुवास दिवसे यांनी आषाढी वारी निमित्त देहू येथे भेट दिली.



### आवश्यक माहिती बैठकीपूर्वी प्राप्त होत नाही

» इंद्रायणी नदीपात्रात अनेक ठिकाणी भराव टाकून आणि पूररेषेत प्लॉटिंग करण्यात येत आहे. यामध्ये संतपीठ येथील बाग वस्ती परिसरात प्लॉटिंग करण्यात आले आहे. एनए झालेले आणि आर झोन केलेले अशी जाहिरात करून अर्धा, एक, दोन गुंठ्याचे छोटे भूखंड नागरिकांकडून विकत घेतले जात आहेत. त्यावर अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. दरम्यान, पालिकेने केलेल्या कारवाईमुळे या भागातील अनधिकृत प्लॉटिंग करणारे व लाखो रुपये गुंतवणूक करून भूखंड विकत घेणाऱ्या नागरिकांची चिंता वाढली आहे.

इंद्रायणी नदी पात्रातील जलपर्णी आणि नदीकाठी टाकलेला भराव पाहून त्यांनी पाटबंधारे विभागाला चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल यांनी देहू येथे भेट दिली. याबाबत दिगंबर डुबल यांनी सांगितले, “नदीपात्रात अतिक्रमण झालेले आहे.

एका हॉटेल मालकाने नदीपात्रात मातीचा भराव टाकून त्या ठिकाणी वृक्षारोपण केले आहे. त्याचा वापर पार्किंगसाठी होत आहे. इंद्रायणी नदीला पूर आल्यानंतर पुराचे पाणी सरळ संत तुकाराम देऊळवाडाकडे येण्याची शक्यता आहे. संबंधित मालकाला हा भराव त्वरित काढण्याचे आदेश दिलेले आहेत. आणि भराव त्वरित काढण्यात आला नाही तर, पाटबंधारे विभागाकडून कारवाई करण्यात येईल.”

### बंधारा करण्याची मागणी

» संत तुकाराम महाराज देवळवाड्याच्या शेजारी इंद्रायणी नदीमध्ये पूर्वी छोटा बंधारा होता. त्यामुळे या बंधाऱ्यात पाणी साठलेले राहायचे. वारकऱ्यांना त्याचा उपयोग हातपाय धुण्यासाठी होत असे. मात्र, हा बंधारा सध्या नाही. त्याचे पूर्वीचे नकाशे पाहून योग्य ती कार्यवाही करू. संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी बंधारा व्हावा अशी मागणी केली आहे. यावेळी संस्थानचे विश्वस्त अजित महाराज मोरे यांनी कार्यालयात डुबल यांचा सत्कार केला.

नदीपात्रालगत भराव, राडारोडा टाकून प्लॉटिंग होत आहे. ब्लू लाईनमध्ये जागेचे ले-आऊट करून प्लॉटची विक्री होत आहे. नदीपात्रात हे प्रकार होऊ लागल्याने भविष्यात गंभीर पूरस्थिती उदभवणार आहे.

या भागात इंद्रायणी नदीपात्रालगत तसेच पूररेषेतच अर्धा, एक, दोन गुंठ्यांचे छोटे भूखंड तयार केले आहेत. हे प्लॉटिंग विनापरवाना असूनही नागरिकांकडून विकत घेतले जात आहेत. त्यावर अनधिकृत बांधकामे सुरू आहेत.

महापालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत अतिक्रमण निर्मूलन पथकाने शुक्रवारी (दि. २२) चिखलीतील संतपीठ पाठीमागे चालू असलेल्या तीन मोठ्या बांधकामांवर कारवाई केली. ही बांधकामे तेथे अनधिकृतपणे सुरू असलेल्या प्लॉटिंगमध्ये केली जात होती. त्यावर पालिकेने केलेल्या कारवाईमुळे या भागातील अनधिकृत प्लॉटिंग करणारे व लाखो रुपये गुंतवणूक करून भूखंड विकत घेणाऱ्या नागरिकांची चिंता वाढली आहे.

# निगडी-तळवडे रस्त्यावर वाहतूक कोंडीचा ‘चक्रव्यूह’

## अतिक्रमणे, खासगी कंपन्यांच्या बस आणि अवजड वाहनांच्या रहदारीमुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी

**पिंपरी | प्रतिनिधी**

अतिक्रमणे, खासगी कंपन्यांच्या बस आणि अवजड वाहनांच्या रहदारीमुळे निगडी - तळवडे रस्त्यावरील वाहनचालकांना वाहतूक कोंडीच्या ‘चक्रव्यूहा’ला दररोज सामोरे जावे लागत आहे. सकाळ-संध्याकाळ वाहनांच्या दूरवर रांगा लागत आहेत. त्यामध्ये अडकून पडल्याने वाहनचालकांचे पुढील नियोजन पूर्णपणे कोलमडत असून ते अक्षरशः हैराण झाले आहेत.

तळवडे भागातील आयटी पार्क आणि चाकण येथील एमआयडीसीमुळे निगडी -तळवडे रस्त्यावर दररोज शेकडो वाहनांची ये-जा सुरू असते. तसेच निगडी भागात शाळा, महाविद्यालय, खासगी, क्लासेस, सरकारी कार्यालये, रुग्णालये, मुख्य बसथांबे यासह विविध कार्यालये असल्याने देहू, तळवडे, म्हाळुंगे, चाकण या भागांतून



> “ निगडी-तळवडे रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आमच्याकडून योग्य नियोजन केले जाते. ज्याठिकाणी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते; त्याठिकाणी पोलिस अंमलदार नेमले जात आहेत. या मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यासह चालकांनीही वाहतूक नियमांचे पालन करणे करणे आवश्यक आहे.
> - संदीप जमदाडे, पोलिस निरीक्षक, तळवडे वाहतूक विभाग

निगडीकडे येणाऱ्या नागरिकांची संख्याही अधिक असते. मात्र, या मार्गाने जाताना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. सकाळी व सायंकाळी तर वाहनांच्या दूरपर्यंत रांगा लागतात. त्यातून मार्ग काढताना वाहन चालकांना अक्षरशः कसरत करावी लागत असून मनस्ताप सहन करावा लागत आहे.

### खासगी बसचे अवैध थांबे

» कंपनीतील कर्मचाऱ्यांची ने-आण करणाऱ्या अनेक खासगी बस या मार्गावरून धावतात. या कर्मचाऱ्यांना ठिकठिकाणांहून घेण्यासाठी व सोडण्यासाठी त्या रस्त्यात कुठेही किंवा चौकातच थांबतात. त्यामुळे बसच्या मागे वाहनांच्या रांगा लागतात. त्या पार्श्वभूमीवर बस थांबण्यासाठी जागा निश्चित करून देणे आवश्यक आहे.

गणेशनगर व त्रिवेणीनगर चौकांत रस्त्याच्या चार ऐवजी दोनच मार्गिका होतात. तसेच गणेशनगर, ज्योतिबा मंदिर चौक, टॉवर लाईन येथे बाजूच्या रस्त्यावरून अचानक वाहने मुख्य रस्त्यावर आल्यास वाहतूक कोंडीत भर पडत आहे. अतिक्रमणे व रस्त्यालगत उभ्या केलेल्या वाहनांमुळे रस्ता आणखीनच अरुंद होतो. त्याने वाहनांना ये-जा करण्यासाठी पुरेसा रस्ता उपलब्ध होत नाही.

वाहतूक कोंडी टाळण्यासह अपघात रोखण्यासाठी अवजड वाहनांना या मार्गावर सकाळी व सायंकाळी प्रवेशास मनाई केली आहे. तरीही जड अवजड वाहने सुसाट धावत असतात. हे देखील वाहतूक कोंडी होण्याचे प्रमुख कारण आहे. रस्त्यावरील अतिक्रमणे तसेच बेशिस्तपणे कुठूनही आडवी येणारी वाहने यामुळे कोंडीत भर पडते. तरी या मार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे.

# निवडणूकीनंतर सरकार आमचेच : शरद पवार

## आगामी निवडणूकीत राज्याचे सरकार आमचेच असेल असा निर्धार त्यांनी या वेळी बोलताना व्यक्त केला

**पुणे | प्रतिनिधी**

या वेळी आम्ही ठरवलंय महाराष्ट्राचे सरकार काही झाले तरी हातात घ्यायचे आहे. त्यानंतर पाणी, कांदा व दुधाच्या दराचा प्रश्न कसा सुटत नाही ते बघू. आता तुम्ही विधानसभेसाठी काम करा. बाकी कामाचे ओझे माझ्या खांद्यावर टाका, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सुपे (ता. बारामती) येथे दिली. आगामी निवडणूकीत राज्याचे सरकार आमचेच असेल असा निर्धार त्यांनी या वेळी बोलताना व्यक्त केला.

तालुक्यातील शिर्सुफळ, उंडवडीसुपे व सुपे येथे पवार यांचा जनसंवाद दौरा होता. यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी तरूण व ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्यावतीने पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पक्षाचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, विकास लवांडे, तालुकाध्यक्ष ॲड. एस.एन.जगताप, ज्येष्ठ कार्यकर्ते सतीश खोमणे, सदाशिव सातव, युगेंद्र पवार, वनिता बनकर, हनुमंत चांदगुडे, सचिन लडकत, महादेव भोंडवे आदींसह आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



> दुधाला सरकारने अनुदान देणे गरजेचे होते. मात्र, दुधाला दर नसल्यामुळे आणि अनुदान मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचा दूध व्यवसाय अडचणीत आहे. तसेच, कांद्याची निर्यात बंद असल्यामुळे उत्पादक अडचणीत आला आहे. असे अनेक प्रश्न आहेत.
> - शरद पवार, ज्येष्ठ नेते

दरम्यान, कान्हाटीच्या माजी सरपंच प्रिती जगताप, ईश्वर लोणकर यांच्यासह काही कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. शेवाळे यांनी त्यांचा सत्कार केला. तर नीट परीक्षेत चांगले गुण मिळवल्याबद्दल जिनत शेख हीचा सत्कार करण्यात आला.

पवार म्हणाले - जनाई योजना मंजूर करण्याचा अधिकार माझ्याकडे होता. काही ठिकाणी जमिनीच्या अडचणी आल्या तर काही भागात कालवे झाले नाही. योजनेचा फायदा काही भागाला झाला तर काही भाग वंचित आहे. चाऱ्यांची कामे अपुरी आहेत. आवर्तन वेळेवर मिळत नाही. ही अर्धवट कामे झाली. त्याची पूर्तता करून घ्यावी लागणार आहे. आता सुप्याकडे येताना कारखेल, देऊळगावरसाळ या गावाहून आलो. आज माझ्याकडे निवेदने आली तीत पाण्याची निवेदने अधिक आहेत. जनाई-शिरसाई योजनेद्वारे तलाव भरावेत. पाईपलाईन करावी तर काहींच्या मते करू नये अशा मागण्या आल्या आहेत.

परिसरातून दुधाचे दररोजचे संकलन सुमारे ३० हजार लिटर आहे. दुधावर प्रक्रिया करणारे तीन कारखाने आहेत. दुधाचा जोडधंदा प्रपंच चालवण्याकरिता उपयुक्त असल्याने प्रतिलीटर पाच रूपये दर वाढवून देण्याची मागणी सरकारकडे केली होती. निर्णय घेतला पण पैसे मिळाले नाहीत. यापुढे दुधाची रक्कम वाढवून घेण्याची मागणी करावी लागेल. कर्नाटक, गुजरातच्या कांद्यावर कर नाही. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील कांद्यावर ४० रूपये निर्यात कर बसवला. परिणामी कांद्याची खरेदी थांबली.

जनाई योजनेत कान्हाटी, बाबुर्डी, शेरेचीवाडी या गावांचा समावेश करावा. आवर्तनाचा कालावधी ठरवून द्यावा. विधान सभेला शरद पवार हेच उमेदवार समजून काम करू. असे मत पोपटराव पानसरे यांनी प्रास्तावीकात व्यक्त केले. सुत्रसंचालन दिपक वाबळे यांनी केले. आभार समाधान देशमुख यांनी मानले.

### कामाचे ओझे माझ्या खांद्यावर टाका

» निवडणूकीत कोणते बटण दाबायचे हे कतृत्व तुम्ही दाखवले. तुम्ही तुमचे काम केले. आता तुम्ही विधानसभेचे काम करा. बाकी कामाचे ओझे माझ्या खांद्यावर टाका, असे सांगून पवार म्हणाले - आज खासदार सुप्रिया सुळे येणार होत्या, पण कौटुंबिक महत्वाच्या कामामुळे बाहेरगावी गेल्यामुळे येऊ शकल्या नाहीत. त्या यथावकाश आपल्या भागाला भेट देतील व तुमच्या कामात लक्ष घालतील याबाबत माझ्या मनात शंका नाही.

# ऑनलाइन रमी खेळला आणि दीड एकर शेतजमीन विकली

## दौंड तालुक्यातील युवकाने वडिलोपार्जित दीड एकर जमीन विकल्याचे ग्रामस्थांनी सांगितले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यामध्ये ऑनलाइन रमी खेळून अनेक युवक देशोधडीला लागले आहेत. त्यापैकी काही युवकांनी शेतजमीन विकली आहे. तर काहीजण कर्जबाजारी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. आधुनिक काळामध्ये मोबाईल म्हणजे अल्लाउद्दीनचा दिवा समजला जातो. कारण काही सेकंदात जगाच्या कानाकोपऱ्याची माहिती मोबाईलमुळे उपलब्ध होत आहे.

बुद्धीचा खेळ म्हणून प्रचलित असणाऱ्या ऑनलाइन रमी खेळाला अनेक तरुणांना आकर्षित केले आहे. अनेक बेरोजगार तरुण यात फसले आहेत. ग्रामीण भागात या खेळाचे अक्षरशः पेव फुटले आहे. अनेक तरुण यामुळे अक्षरशः कंगाल झाले आहेत. सुरवातीला हा खेळ खेळण्यासाठी आगाऊ रक्कम (बोनस) दिला जातो. कमी पैसे लावून सुरवातीस युवक खेळतात. सुरवातीस खेळ जिंकल्यानंतर पैसे मिळतात तसे या खेळाच्या प्रती उत्सुकता वाढते. या खेळातून पैसा मिळाल्यानंतर दिवसेंदिवस या खेळावरती पैसे गुंतविण्याचे प्रमाण वाढत जाते.




> अद्याप यवत पोलिस ठाण्यामध्ये या संदर्भात तक्रार आली नाही. परंतु बहुतांशी युवक हा खेळ खेळत असल्याचे निदर्शनास आले आहे. पालकांनी त्यासंदर्भात तत्पर राहणे गरजेचे आहे. आमच्याकडे तक्रार केल्यास आम्ही संबंधित युवकाचा बंदोबस्त करण्यासाठी तत्पर आहोत.
> - नारायण पवार, पोलिस निरीक्षक यवत

तरुणांना मोठ्या आर्थिक आकर्षणाचे व सहज पैसे कमवायचे स्वप्न दाखवले जाते. या जुगारात आपली अपत्ये किती खोल गर्तेत अडकलेली आहेत हे अद्याप अनेक पालकांना माहीत नाही. घरबसल्या खेळला जाणारा हा जुगार अनेक जणांना बेघर करणारा आहे. यामध्ये क्लासिक रमी, जंगली रमी, ताज रमी, रमी सर्कल, इंडिगो रमी, रमी फॅशन, रमी व्हिला, डेक्कन रमी, खेळ प्ले रमी, येस २ थ्री रमी अशा अनेक प्रकारच्या रमीचे सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत.

### गेमने झाला आयुष्याचा गेम

» नमस्कार, मी घंट्या ऊर्फ घंटणकुमार पूर्वी मी माझ्या मालकाबरोबर मोठे बंगल्यात राहायचो. माझ्या मालकाला १५ म्हशी होत्या. मग मी जंगली रमी खेळायला शिकलो. आणि माझ्या मालकाला पण रमी खेळायला शिकवले. आता मी त्या १५ म्हशीपण विकल्या. मालकाने बंगला पण विकला. आता मालक रिक्षा चालवतात व मालकांना मी रिक्षा मध्ये बसण्यासाठी प्रवासी बघून देतो. जंगली रमीला आग लागो महाराज! हा व्हिडिओ सध्या सोशल मीडिया वरती प्रचंड व्हायरल होत आहे.